# Python rescue on GU campus

On 18th June, 2020, Dr. Nitin Sawant, Assistant Professor, Department of Zoology, Goa University and Dikansh Parmar (Research Scholar), rescued around 15 eggs of Pythonmolurus (Indian Rock Python) on the Goa University Campus. After rescuing the eggs from the gushing waters the team recorded necessary scientific details and later released the snakes near the site once all the eggs hatched. It is a non-venomous snake widely distributed all over Goa. A python generally lays 18 to 100 eggs from March to June. The egg size on average is 75mm to 100mm. The hatchling period is 60 to 90 days. It falls in schedule-I category, as per Wildlife Protection Act 1972 and given priority for conservation.

Goa University campus is rich with flora and fauna, especially during rains its beauty increases abundantly. Dr Sawant said that the campus is full of such wildlife and he emphasised that one should not panic on seeing these species as they are an integral part of our life. Necessary precautions may be taken to avoid stepping on them. He also advised that if anyone needs assistance, his team would be happy to come and rescue the snakes.

Dr. Nitin Sawant, is working on the project titled Diversity of Herpetofauna of Goa, Maharashtra and Karnataka, sanctioned by the Ministry of Environment and Forest and Climate Change, Government of India, New Delhi. Research objectives are to study the diversity of Herpetofauna of the three states mentioned above and also to carry out molecular studies.







# विद्यापीठ परिसरात अजगराची अंडी

**पणजी** : गोवा विद्यापीठ परिसरात अजगराची १५ अंडी आढळून आली आहेत. अजगर हे मार्च ते जून या कालावधीत १८ ते १०० अंडी घालतात. एका अंड्याचा आकार ७५ ते १०० मिमी असतो. त्यातून ६० ते ९० दिवसांत ही अंडी फलित होऊन पिल्ले बाहेर पडतात. 'वन्यजीव संरक्षण कायदा १९७२' नुसार या अंड्यांना संरक्षण देण्यात आले आहे. ही माहिती विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. नितीन सावंत यांनी दिली.

डॉ. सावंत हे केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या अंतर्गत सुरू असलेल्या संशोधन कार्यात सहभागी आहेत. या मंत्रालयाअंतर्गत महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोव्यात सरपटणाऱ्या प्राण्यांवर अभ्यास आणि संशोधन केले जात आहे. डॉ. सावंत यांच्यासह गुजरात येथील संशोधक दिकांश परमार यांनी गोवा विद्यापीठाच्या आवारात सापडलेल्या अजगराच्या अंड्यांचा अभ्यास सुरू केला आहे. ही अंडी वाहत्या पाण्याजवळ सापडल्याने प्रयोगशाळेत त्यांची नोंद व निरीक्षण करून फलित झाल्यानंतर पिल्लांना मूळ ठिकाणी सोडण्यात आले. यासंदर्भात राज्य वनखाते आणि केंद्रीय खात्याला कळवण्यात आले आहे.



अजगराची अंडी दाखवताना डॉ. नितीन सावंत व सहकारी.

Fri, 19 June 2020
epaper.thegoan.net/c/52846289